नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ७६ Issue - 76 | वार शनिवार दि. २ ऑगस्ट २०२५ Blow- Saturday Date 2 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

## आक्षेपार्ह पोस्टवरुन दोन गटात तणाव, पोलिसांचा लाठीमार

### पुण्याच्या यवतमध्ये जोरदार दगडफेक; अनेकजण जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे: पुण्याच्या दौंडमधील यवतमध्ये चार दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची विटंबना केल्याच्या कारणावरून तणाव निर्माण झाला होता. यावरून यवतसह दौंड तालुक्यात बंदचे आवाहन करण्यात आले होते. यादरम्यान काल भाजपचे नेते गोपीचंद पडळकर, संग्राम जगताप तसेच किन्नर आखाड्याच्या प्रमुख जगद्गुरु स्वामी हेमांगी सखीजी या तिघांनी या ठिकाणी येऊन भाषणे केली. त्यांची पाठ फिरताच यवत मध्ये आज सकाळी दंगल उसळली.



यवतमध्ये काल गोपीचंद पडळकर व आमदार संग्राम जगताप यांच्यासह इतरांची भाषणे झाली. त्यानंतर 'फेसबुकवर' एक पोस्ट टाकल्याच्या कारणावरून पुन्हा तणव निर्माण झाला आणि त्यानंतर आज थेट सकाळी बाजारपेठ बंद करून काही घरे, बेकरी व धर्मस्थळावर जमावाने हल्ला केला. यात काही दुकाने व घरांना आगी लावण्यात आल्या.

घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि दंगल नियंत्रण पथक या ठिकाणी पोचले. त्यांनी अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडल्या आणि जमावाला पांगवण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर यवतमध्ये तणावपूर्ण शांतता आहे.

प्रतिमेची विटंबना झाल्याच्या प्रकरणात पोलिसांनी आरोपीलादेखील ताब्यात घेतले व तातडीने अटक केली मात्र त्यानंतरही परिसरातील वातावरण तणावाचे होते. त्यातच फेसबुक वरील आक्षेपारह पोस्टची भर पडल्याने वातावरण हिंसक बनले.

पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवले असून पोलिसांनी या ठिकाणी जमावबंदीचा आदेश लागू केला आहे.

आज यवतमध्ये आठवडे बाजार भरतो. पण तणावपूर्ण परिस्थिती पाहता बाजार भरलेला नाही.

स्थानिकांनी संयम बाळगावा आणि शांतता ठेवावी, असं आवाहन दौंडचे आमदार राहुल कुल यांनी केलं. पोलिसांकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्याविरोधात कारवाई करण्यावरुन एकमत झालं होतं. पण दरम्यान एकानं आक्षेपार्ह पोस्ट केली आणि उद्रेक झाला. त्यामुळे परिस्थिती बिघडली, असा घटनाक्रम कुल यांनी कथन केला. सगळ्या लोकांना विश्वासात घेऊन प्रशासनाच्या मदतीनं शांतता प्रस्थापित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्या प्रयत्नांना यशदेखील येत असल्याचं आमदार कुल म्हणाले.

## पुण्याच्या यवतमध्ये अजित पवारांनी दिली भेट; तणावपूर्ण परिस्थिती नियंत्रणात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यातील यवतमध्ये आज सकाळी तणाव निर्माण झाला. एका वादग्रस्त पोस्टमुळे हा वाद निर्माण झाला होता. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. आताच दंगल संदर्भात माहीत घेतली. बाहेरच्या व्यक्तीने चुकीचं स्टेटस ठेवलं, यामुळे तणाव निर्माण झाला. रस्त्यावर जमावाला पांगवण्याकसाठी लाठीचार्ज करण्यात आला, आता मात्र परिस्थिती नियंत्रणात आहे. दोन्ही समाजाची लोकं एकत्रित बसली आहेत. तणाव संपवण्याचा प्रयत्न चालला आहे. अशाप्रकारे जाणीवपूर्वक तणाव निर्माण झाला पाहिजे म्हणून काही लोक स्टेटस ठेवतात, असा प्रकार पाहायला मिळत आहे. या सर्वांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मला एक सांगा, सभा झाल्यावर असं स्टेटस ठेवण्याची मुभा कोणी दिली आहे का? सभा आणि दंगलीचा संबंध जोडण्याचा प्रयत्न करू नका. सभेमुळे स्टेटस ठेवलं असं म्हटलं तर ते सहन केलं जाणार नाही. आता त्या ठिकाणी शांतता आहे, आता व्हिडीओ नेमके तिथले आहेत की बाहेरचे ते तपासावे लागेल. अशा परिस्थिती बाहेरचे व्हिडीओ किंवा एडिटेड व्हिडीओ दाखवले जातात. त्या ठकाणी चौकशी केली जाईल. माझं सगळ्यांना आवहन आहे, शांतता राखा, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

यवतमधील परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार हे स्वत: यवतला गेले. तिथे त्यांनी काय-काय नुकसान झालं आहे याची पाहणी केली. तसेच त्यांनी सविस्तर माहिती जाणून घेतली. यानंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. काही दिवसांपूर्वी इथे जी घटना घडली होती. त्यानंतर काही लोकप्रतिनिधींनी इथे येऊन भाषणं केली होती. हे सगळं घडल्यानंतर सर्व शांत होतं.

पण कुठेतरी मध्य प्रदेशमध्ये एक घटना घडली. ती घटना घडल्यानंतर एकाने मोबाईलला पोस्ट केली. त्यातून इथे थोडीशी गडबड झाली. पण मी यवतकरांना, दौंडकरांना, पुणेकरांना, महाराष्ट्रातील जनतेला सांगू इच्छितो की, इथली पूर्ण परिस्थिती पोलिसांनी आटोक्यात आणली आहे. कोल्हापूरहून वरिष्ठ पोलीस अधिकारी इथे आले आहेत. पोलिसांची मोठी कुमक येथे आहे, अशी माहिती अजित पवारांनी दिली.

आता मी माझ्या काही सहकाऱ्यांना भेटलो. त्यांनी सांगितलं की, दादा यवतमध्ये कधीच अशी घटना घडलेली नाही. आम्ही सर्व एकोप्याने, जातीय सलोखा ठेवून या परिसरात राहून आलेलो आहे. आज आठवडे बाजार असतो. पण तो आज बंद आहे. मी इतरांनादेखील आवाहन करतो. अफवांवर विश्वास ठेवू नका. परिस्थिती पूर्णपणे पोलिसांच्या नियंत्रणात आहे. आपण सगळे एकमेकांना सहकार्य करा. ज्याने पोस्ट टाकली आहे त्याचा इथला संबंध नाही. तो काही वर्षांपूर्वी नांदेडहून आला आहे. तो बिगारीचं काम करतो. पाठिमागच्या काळात थोडं काही घडलेल्यामुळे काहींनी आक्रमक भूमिका घेतली. त्यातून इथे तोडफोड झालेली दिसते. पंचनामे आणि इतर गोष्टी होती. आम्ही पूर्णपणे या सगळ्या गोष्टींकडे लक्ष ठेवून आहोत, अशी माहिती अजित पवारांनी दिली.

## 'श्यामची आई'ला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने आज ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार २०२३ ची घोषणा केली. यामध्ये सुजय डहाके दिग्दर्शित 'श्यामची आई' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट पुरस्कार जाहीर झाला आहे. तर, आशिष बेंडे दिग्दर्शित मराठी चित्रपट 'आत्मपॅम्फलेट' तसेच 'नाळ २' चित्रपटाला स्वर्ण कमळ पुरस्कार घोषित झाला आहे.




सर्वोत्कृष्ट बाल कलाकार पुरस्कार जिप्सी या चित्रपटातील बाल कलाकार कबीर खंदारे तर त्रिशा ठोसर, श्रीनिवास पोकळे आणि भार्गव जगताप यांना संयुक्तपणे नाळ २ चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला आहे.

यावेळी ४० फीचर चित्रपट पुरस्कार, १५ नॉन-फीचर पुरस्कार आणि १ चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. फीचर चित्रपट पुरस्कार निवडीच्या ज्युरीचे नेतृत्व आशुतोष गोवारीकर, नॉन-फीचर ज्युरीचे नेतृत्व पी. शेषाद्री आणि चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन ज्युरीचे नेतृत्व गोपाळकृष्ण पै यांनी केले. २०२३ वर्षामधील राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार फीचर, नॉन फीचर आणि चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन अशा तीन विभागांमध्ये जाहीर करण्यात आले. हे पुरस्कार लवकरच प्रदान केले जाणार आहेत.

**७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा**

सर्वोत्कृष्ट अभिनेता आणि अभिनेत्री पुरस्कार

हिंदी चित्रपट १२ वी फेलला सर्वोत्कृष्ट फीचर चित्रपट पुरस्कार जाहीर झाला. जवान चित्रपटासाठी शाहरुख खान आणि '१२ वी फेल'साठी विक्रांत मेस्सी यांना संयुक्तपणे 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' पुरस्कार जाहीर झाला. राणी मुखर्जीला 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार' जाहीर करण्यात आला.

'आत्मपॅम्फलेट'साठी आशिष भेंडे यांना पुरस्कार

दिग्दर्शकाचा सर्वोत्कृष्ट पदार्पणाचा चित्रपट पुरस्कार दिग्दर्शक आशिष भेंडे यांना आत्मपॅम्फलेट या मराठी चित्रपटासाठी जाहीर करण्यात आला.


राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट

सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट - कटहल- अ जॅकफ्रुट मिसरी, सर्वोत्कृष्ट अभिनेता- शाहरुख खान आणि विक्रांत मेस्सी, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री- राणी मुखर्जी, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक - सुदिप्तो सेन, द केरला स्टोरी, सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री - उर्वशी, उलोझुक्कु, सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता - विजयराघवन आणि मुथुपेट्टई सोमू भास्कर, राष्ट्रीय, सामाजिक आणि पर्यावरणीय मूल्यांना प्रोत्साहन देणारा सर्वोत्कृष्ट चित्रपट - सॅम बहादुर या चित्रपटास पुरस्कार घोषित करण्यात आला.

## जि.प. कर्म. सह.पत. संस्था नियमित नं. १ सोलापूर या संस्थेच्या संचालकपदी रोहित घुले यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था नियमित नं.१., सोलापूर या संचालक मंडळाच्या आज दिनांक ३१/०७/२०२५ रोजी झालेल्या सभेत स्व. विवेकानंद रामकुमार लिंगराज यांचे अपघाती निधनाने रिकामी झालेली सर्वसाधारण गटातील रिक्त जागा आज अध्यासी अधिकारी श्री ए ए गावडे, सहाय्यक उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाची सभा स्व. विवेकानंद लिंगराज सभागृह मध्ये संपन्न झाली. सदर निवडीसाठी कार्यक्रम तयार केला होता त्यानुसार सर्वसाधारण एका जागेसाठी श्री रोहित रामचंद्र घुले, बांधकाम विभाग १, जि.प. सोलापूर यांच्या एकमेव अर्ज आल्याने व सदर अर्ज विहित नमुन्यात व वैध असलेमुळे अध्यासी अधिकारी यांनी त्यांची बिनविरोध निवड जाहीर केली. सदर सभेस मार्गदर्शक दयानंद परिचारक, पंडित भोसले, प्रकाश शेटे, बी टी मोहिते, अशोक भोसले, व्ही आर गरड, व्ही डी नवले तसेच संस्थेचे चेअरमन डॉ. एस.पी. माने, व्हाईस चेअरमन एस एन कुंभार, तसेच संचालक व्ही बी पाटील, एस आर तांबोळी, एस एस कलशेट्टी, व्ही एम घेरडे, व्ही व्ही घोगरे, जी एम मारडकर, एस डी म्हमाणे, टी ए मुतवल्ली, एस एच राठोड, सी ए वाघमारे, सौ. एम एस शिंदे, तज्ञ संचालक एस एन देशमुख, एन बी शिंदे आदी उपस्थित होते.






## संपादकीय....

### गौरव चित्रपटांचा

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने आज ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार २०२३ ची घोषणा केली. यामध्ये सुजय डहाके दिग्दर्शित 'श्यामची आई' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट पुरस्कार जाहीर झाला आहे. तर, आशिष बेंडे दिग्दर्शित मराठी चित्रपट 'आत्मपॅम्फलेट' तसेच 'नाळ २' चित्रपटाला स्वर्ण कमळ पुरस्कार घोषित झाला आहे. सर्वोत्कृष्ट बाल कलाकार पुरस्कार जिप्सी या चित्रपटातील बाल कलाकार कबीर खंदारे तर त्रिशा ठोसर, श्रीनिवास पोकळे आणि भार्गव जगताप यांना संयुक्तपणे नाळ २ चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला आहे. यावेळी ४० फीचर चित्रपट पुरस्कार, १५ नॉन-फीचर पुरस्कार आणि १ चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. फीचर चित्रपट पुरस्कार निवडीच्या ज्युरीचे नेतृत्व आशुतोष गोवारीकर, नॉन-फीचर ज्युरीचे नेतृत्व पी. शेषाद्री आणि चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन ज्युरीचे नेतृत्व गोपाळकृष्ण पै यांनी केले. २०२३ वर्षामधील राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार फीचर, नॉन फीचर आणि चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन अशा तीन विभागांमध्ये जाहीर करण्यात आले. हे पुरस्कार लवकरच प्रदान केले जाणार आहेत. हिंदी चित्रपट १२ वी फेलला सर्वोत्कृष्ट फीचर चित्रपट पुरस्कार जाहीर झाला. जवान चित्रपटासाठी शाहरुख खान आणि '१२ वी फेल'साठी विक्रांत मेस्सी यांना संयुक्तपणे 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' पुरस्कार जाहीर झाला.

# खडवली फाटा उड्डाणपूलावर वरच्या भागास गेला तडा: वाहनांचा वेग कमी करण्यासाठी बॅरिकेड्सचा आधार

## राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या कामांवर निर्माण झाले प्रश्न चिन्ह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :
मुंबई, नाशिक महामार्गावरील खडवली फाटा येथील उड्डाणपूल सुरू होऊन फक्त एक ते दीड महिना गेला असून त्या उड्डाणपुलाच्या वरच्या भागास ,मध्यभागी तडा पडला आहे. तर आजूबाजूला खोलगट भाग निर्माण झाला असून , वाहन चालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. मुंबई, नाशिक महामार्गावर चोवीस तास वाहनांची रेलचल सुरूच असते. त्या ठिकाणी वाहनांचा वेग कमी होण्यासाठी उड्डाणपुलावर बॅरिकेड्स लावण्यात आलेले आहेत. परंतु वाहने तडा गेलेल्या भागातून वेगाने जात असल्याने अपघात होण्याची शक्यता प्रवाशांकडून वर्तवली जात असून,



राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या कामांवर प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे. तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असून नागरिकांकडून नाराजी व्यक्त होतांना दिसत आहे.गेल्या दोन वर्षापूर्वी याच खडवली फाट्यावर झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर सर्व पक्षीय आंदोलन देखील करण्यात आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असताना ते पाहणीसाठी आले होते. त्यानंतर लवकर प्रलंबित कामे करावी. असे आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानंतर खडवली फाटा अपघाताचे गांभीर्य लक्षात घेता हा उड्डाणपूल बांधण्यात आला आहे. २ वर्ष उलटूनही या भीषण अपघाताची आठवण पडघा परिसरातील नागरिकांच्या डोळ्यासमोर आहेच. परंतु एवढ भिषण अपघात होऊन सुद्धा मुंबई, नाशिक राष्ट्रीय महामार्गावर खडवली फाटा येथील उड्डाणपूलावर वरच्या भागात,मध्यभागी तडा गेल्याने राष्ट्रीय महामार्गावर प्राधिकरण विभागाच्या कामांवर प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे.तर संमधित टोल कंपनीचा तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचा याकडे दुर्लक्ष होत असून नागरिकांकडून नाराजी व्यक्त होतांना दिसत आहे. विविध कामे प्रलंबित असल्याने काही दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गट व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने टोलनाक्यावर धडक मोर्चा नेऊन टोलनाका बंद पाडला होता या प्रकरणाची ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी गंभीर दखल घेत तात्काळ महामार्ग प्राधिकरण टोल नाका कंपनी, पोलीस प्रशासन आंदोलक यांच्या समवेत बैठक घेतली होती. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व बाजू ऐकून घेत महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक श्रीकांत ढगे यांना तात्काळ महामार्गाची प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. प्रलंबित कामे अजून पूर्ण होतील तरी कधी? याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. मुंबई ,नाशिक महामार्गावर असलेल्या खडवली फाटा येथील उड्डाणपुलावर वरच्या भागास,मध्यभागी तडा गेला असून, तो तडा वेळेतच बुजविला न गेल्याने त्याठिकाणी अजून मोठा तडा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उड्डाणपूलावर तडा पडल्याने या महामार्गाच्या कामांमध्ये होत असलेला हलगर्जीपणा व कामाचा निकृष्ट दर्जा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

# पुणे येथील विधान भवन परिसरात 'महसूल सप्ताह २०२५'चा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
मुंबई : महसूल दिनाचे औचित्य साधून विभागीय आयुक्त कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथील विधान भवन परिसरात 'महसूल सप्ताह २०२५'चा शुभारंभ उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.ना. श्री. अजितदादा पवार यांच्या हस्ते करण्यात आला.



या कार्यक्रमात महसूल विभागात उल्लेखनीय सेवा बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव मा. अजितदादांच्या हस्ते करण्यात आला. ०१ ऑगस्ट ते ०७ ऑगस्ट या कालावधीत साजऱ्या होणाऱ्या लोकाभिमुख महसूल सप्ताहानिमित्त त्यांनी सर्व नागरिकांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी बोलताना मा. अजितदादा म्हणाले, कृषी, उद्योग, बांधकाम विभागांप्रमाणे महसूल विभागही प्रशासनाचा कणा असून, राज्य आणि देशाच्या कारभारात या विभागाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. महसूल दिन हा प्रशासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि लोकाभिमुखतेचा पुन्हा एकदा आढावा घेण्याचा दिवस आहे.

तसेच त्यांनी पुढे सांगितले की, महसूल विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व सेवा नागरिकांना सुलभ आणि गतिमान पद्धतीने मिळाव्यात, यासाठी ऑनलाईन सुविधांचा प्रभावी वापर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) तंत्रज्ञानाचा अधिकाधिक उपयोग करणे आवश्यक आहे.

प्रशासनाच्या कार्यक्षमतेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा पुरवणे हे सरकारचे कर्तव्य आहे. महसूल भवनांची उभारणी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि अधिकाऱ्यांचे सातत्याने सक्षमीकरण ही शासनाची प्राथमिकता आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी कोणतीही मदत कमी पडू दिली जाणार नाही, असे ठाम प्रतिपादनही त्यांनी यावेळी केले.

# मुंडेवाडी गावातील काळी माती व गाळ विनापरवाना उचललेला प्रकार, उघड प्रशासनाची दुर्लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : आपल्याला एक ऑगस्ट मंगळवेढा तालुक्यातील मर्डरवाडी येथील तलावती मोठ्या प्रमाणात काळी माती व गाळ विनापरवाला उचलून नेले जात धकादायी प्रकार समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तलावातील गाळ व काळी माती ट्रॅक्टरच्या साह्याने अनेक दिवसापासून उचलून नेली जात असून, कोणते अधिकृत परवानगी न घेता ही कार्यवाही केली जात असल्याचे उघड झाले यामुळे तलावाची



साठवण क्षमता कमी होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे स्थानिक नागरिकांच्या मते पाणीसाठा आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तलावातील गाळ उपसण्याचा शासन नियमानुसार परवानगी आवश्यक असते मात्र त्या ठिकाणी कोणते नियमांना धाब्यावर बसून ही माती उचलली जात आहे. या प्रकरणामुळे महसूल जनसंपदा व ग्रामपंचायत प्रशासनाच्या भूमिकेत प्रश्नचिन्ह उपस्थित असून, दोषीवर क** कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# खामगाव येथील रोहन पैठणकर मारहाण प्रकरणी सिंदखेडराजा तहसीलदार यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांना निवेदन


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
राहुल साबळे/बुलढाणा :

बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव येथे रोहन पैठणकर या दलित युवकाला केवळ त्याच्या जातीच्या नावावर अमानुष मारहाणीचा बळी पडावे लागले. रोहन पैठणकर या युवकाला गावगुंडांनी गाय चोर आहे असा खोटा आरोप लावून तिघांनी मिळून तीन किलोमीटर अंतरावर जबरदस्तीने अपहरण करून जातीय शिवीगाळ व प्राणघातक मारहाण केली.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तणाव निर्माण झाला असून आंबेडकरी समाजात तीव्र संतापाचे वातावरण पेटले आहे. घटनेतील आरोपी अद्यापही मोकाट फिरत असून, पोलिसांनी कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

जात-पात आणि द्वेषभावनेने पेटलेली ही घटना म्हणजे माणुसकीला काळिमा फासणारी आहे.

या दलित युवकावर झालेल्या अन्यायाविरोधात विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येत जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन दिले. या निवेदनात, जर आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा दिली नाही, तर जनशक्तीच्या जोरावर उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.



**प्रमुख मागण्या –**
- तिन्ही आरोपींवर तात्काळ अटक करून गुन्हा दाखल करावा
- पीडितास संरक्षण व नुकसान भरपाई द्यावी
- संबंधित अधिकाऱ्यांवर हलगर्जीपणाबद्दल कारवाई करावी
- घटना जातीय असल्याने ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत कठोर कारवाई करावी

सामाजिक कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या असलेले निवेदन जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना दि ३० जुलै रोजी निवेदन सादर करण्यात आले असून, सदर निवेदन देताना पत्रकार सचिन खंडारे, पत्रकार रामदास कहाळे, सामाजिक कार्यकर्ते मधुकर शिंदे, पत्रकार डॉक्टर गंगाराम उबाळे, पत्रकार बबन सरकटे, संजय सोनकांबळे, अमोल शेजुळ, अंकुश आखाडे, सुखदेव आखाडे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सोलापूर/जिमाका : कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील भूमिहिन शेतमजूर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना २ एकर बागायत किंवा ४ एकर जिराईत जमीन १०० टक्के अनुदान स्वरुपात खरेदी करुन देण्यात येत असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसुचित जातीचा दारिद्र्य रेषेखालील .व कुटुंब प्रमुखाचे वय ६० वर्षापेक्षा जास्त आहे. अशा कुटुंबातील ६० वर्षपेक्षा कमी वय असणाऱ्या कुटुंबा प्रमुखाच्या पत्नीला या योजनेचा लाभ घेता येईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी विक्रिसाठी जमीन उपलब्ध असलेल्या गावाचा रहिवाशी असावा. प्रस्तुत योजनेंतर्गत ज्या गावात जमीन उपलब्ध आहे त्याच गावातील पात्र लाभार्थ्यांची प्रथम निवड करण्यात येईल व त्या गावातील लाभार्थी उपलब्ध नसल्यास लगतच्या इतर गावातील पात्र लाभार्थ्यांना जमीनीच्या उपलब्धतेनुसार चिठ्या टाकून जिल्हा समितीच्या मान्यतेने विहित कार्यपध्दती नुसार पारदर्शक पध्दतीने लाभ देण्यात येईल.

दारिद्र रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द प्रवर्गातील परित्यक्ता स्त्रिया , दारिद्र रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द विधवा स्त्रिया , अनुसुचित जाती /जमाती कायद्यांतर्गत जातीचे आत्याचारग्रस्त या घटकांना लाभार्थी निवडीमध्ये प्राधान्य देण्यात येईल. महसुल विभागाने गायरान व सिलिंगच्या जमिनीचे वाटप केलेल्या कुटुंबांना लाभ अनुज्ञेय नाही. या योजनेंतर्गत जमीनीचे वाटप झाल्यानंतर संबंधित लाभ धारकाने स्वता: जमीन कसणे आवश्यक आहे. सदर जमीनीचे अन्य व्यक्तीस, संस्थेस हस्तांतरण व विक्री करता येणार नाही तसेच लीजवर भाडेपट्याने देता येणार नाही. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना लाभ देण्यासाठी जिल्हा समाज कल्याण कार्यालयास जमीन खरेदी करावयाची आहे. जमीन कसण्यास अयोग्य, डोंगर उताराची, खडकाळ व नदी पात्रा जवळच्या क्षारयुक्त व क्षारपड जमीन असू नये. जमीन सलग असावी, शेत जमीन विना बोजा व कुळ नसलेली असावी तसेच जमीन कोठेही गहाण अथवा वादग्रस्त नसावी.जमीन विक्रीच्या अर्जावर शेतजमीन विक्री करणाऱ्या जमीन मालकाशिवाय संबंधिताच्या कुटुंबातील दोन व्यक्तींची जमीन विक्रीस संमतीबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. जे जमीन मालक जिरायत जमीन कमाल ५ लाख रुपये प्रती एकर व बागायत जमीन कमाल ८ लाख रुपये प्रती एकर प्रमाणे विक्री करण्यास तयार आहेत अशा जमीन मालकांनी जमीनीच्या ७/१२ व आवश्यक कागदपत्रासह सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, कार्यालय, सोलापूर यांचेशी संपर्क साधावा. तसेच सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसुचित जाती नवबौध्द घटकातील पात्र लाभार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज सहायक आयुक्त समाज कल्याण सोलापूर यांच्या कार्यालयाकडे दाखल असे आवाहनही समाज कल्याणचे सहायक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

**५ वी ते १२ वीचे विद्यार्थी मतदानाचा हक्क बजावणार**

**विद्यार्थी मतपत्रिकेद्वारे मतदान करणार**

# इंदापूरच्या आश्रमशाळेत लोकशाही सुदृढतेसाठी होणार निवडणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
इंदापूर ता.प्रतिनिधी अतुल सोनकांबळे : दि.३१: जगातली सर्वोत्तम लोकशाही म्हणून भारतीय लोकशाही ओळखली जाते. लोकशाहीची ओळख शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना व्हावी आणि मतदान प्रक्रियेविषयी जाणून घेत असताना प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेत विद्यार्थी सहभागी व्हावेत हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्टचे सचिव ड.समीर मखरे यांच्या संकल्पनेतून शाळास्तरावर निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. लोकशाही सुदृढतेसाठी ड.मखरे यांची अभिनव संकल्पना आश्रमशाळांसाठी आदर्शवत ठरणार आहे.



भारतीय लोकशाही ही जगात सर्वोत्तम समजली जाते.१८ वर्षापुढील प्रत्येक भारतीय नागरिकास मतदानाचा अधिकार प्राप्त असतो.मात्र, शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या कानावर निवडणूक,प्रचार,मतदान,मतमोजणी हे शब्द कानावर पडत असल्याने त्यांना निवडणुक प्रक्रियेविषयी कुतुहल असते.विद्यार्थ्यांना लोकशाहीचे महत्व कळावे,निवडणूक प्रक्रिया कशी असते याची माहिती व्हावी,प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेत सहभागाची संधी मिळावी व भविष्यात मतदान प्रक्रियेस सामोरे जाताना कुठलीही अडचण येऊ नये या उद्देशाने संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात निवडणुक प्रक्रिया राबविण्याचा अभिनव निर्णय घेतला आहे.

**मतदान २ ऑगस्ट २०२५ तर दुपारीनंतर होणार मतमोजणी**

उमेदवारी अर्ज भरणे,उमेदवारी अर्ज स्वीकृती, अर्जाची छाननी या प्रक्रिया पूर्ण झाल्या असून उमेदवारांना निवडणूक चिन्ह देण्यात आले असून त्यांचे पॅनल तयार झाले आहे. विद्यार्थ्यांची प्रचाराची रणधुमाळी सुरू असून ते आपलं चिन्ह मतदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी दिलेल्या वेळेत प्रचार करत आहे.

मतदान शनिवार दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी शालेय वेळात होणार आहे. तर मतमोजणी त्याच दिवशी दुपारनंतर होईल.

उमेदवारांमधून निवडलेल्या प्रतिनिधीतून शालेय संयुक्त मंत्रिमंडळ नियुक्त होईल. यामुळे विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रिया समजून घेता येणार असून ही अभिनव संकल्पना भविष्यात आदर्शवत आणि लोकशाहीच्या बळकटीसाठी उपयुक्त ठरणार आहे. अशी माहिती ड. मखरे यांनी पत्रकारांना दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

## महापुरुषांच्या जीवनकार्याविषयी चित्रपट दाखविले विद्यार्थ्यांना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अक्कलकोट यांच्यावतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तसेच लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, दिगंबर जगताप व पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे उपस्थित होते.

स्वातंत्र्य चळवळीच्या ज्वाला भारतीयांच्या मनात - मनात चेतवणारे अग्रगण्य नेते, स्वदेशी चे पुरस्कर्ते व समाजातील अनेक वाईट कुप्रथेविषयी कडाडून विरोध करुन लोकजागृती करणारे जहालमतवादी, प्रखर राष्ट्रवादी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व अन्याय, अत्याचार, शोषण करणाऱ्या जुलमी प्रस्थापितांविरुध्द बंड करून आपल्या शाहीरी, पोवाडे च्या माध्यमातून जनजागृती करणारे थोर समाजसुधारक, साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती निमित्त विद्यार्थ्यांनी भाषणे केली. याशिवाय लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे जीवन परिचय इ.५ वी ते १० वी विद्यार्थ्यांना डिजिटल क्लासरूम मध्ये चित्रपट प्रदर्शित करून दाखविण्यात आले.

यावेळी राजकुमार गवळी, सिद्धाराम पाटील, बाबुशा मंगरूळे, श्रीदेवी मायनाळे, निशिगंधा सोमेश्वर, विद्या बिराजदार, शरणबसप्पा चानकोटे आदी शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.कल्पना स्वामी यांनी केले तर सर्व उपस्थितांचे आभार मनिषा सुरवसे यांनी केले.




# निफाड श्री माणकेश्वर वाचनालयात लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाडची वाचन संस्कृती जोपासणारे श्री माणकेश्वर वाचनालय येथे आज दि. १ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य संग्रामातील जहाल व्यक्तिमत्व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व शोषितांचा आक्रोश लेखणीतून मांडणारे थोर समाज सुधारक, लेखक, कवी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वाचनालयाचे संचालक राजेंद्र खालकर, सुनील चिखले यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार, उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम,सुनील चिखले यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी माजी सरपंच रघुनाथ कुंदे, वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार, उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम, सहचिटणीस राहुल दवते, हिशोब तपासणीस दत्ताकाका उगावकर, संचालक तनवीर राजे यांसह सभासद अशोक पगारे, माणिक गायकवाड, योगेश कुंदे,अनिता कुंदे, काजल कुंदे, ग्रंथपाल नितीन बनसोडे, सहाय्यक ग्रंथपाल आरती जंगम, नंदकुमार पुंड, अनिता इस्ते यांसह वाचक उपस्थित होते. यावेळी आभार संचालक तनवीर राजे यांनी मानले.



# आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांकडून साहित्यसम्राट आणणाभाऊ साठेंची जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : लोकनायक साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमीत्य आज आण्णाभाऊ साठेंना अभीवादन करण्यात आले.

यावेळी आंबेडकरी चळवळीतील भाई कैलास सुखधाने, जेष्ठ नेते सोपानराव देबाजे, तथागत ग्रूपचे संस्थापक अध्यक्ष यूवा नेते संदिपदादा गवई, माजी नगरसेवक सुरेश मानवतकर, संपादक रविद्र वाघ, समाधान साठे, डॉ बाबासाहेब आंबेडकर सह पत संस्थेचे अध्यक्ष विजय खिल्लारे, पत्रकार तथा शाहिर देवानंद वानखेडे, लहुशक्तीचे संदिप कांबळे, ज्योती इंगळे, लताबाई ताकतोडे ता अध्यक्ष लहुशक्ती, राजू आवारे, आश्रू मानवतकर, आदि चळवळीतील अनेक नेते ऊपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ विचारवंत प्रा डि एस वाघसर हे होते. या वेळी वंचित पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दिपक पाडमूख यांच्यासह ईतर सहका-यांनी देखील साहित्य सम्राट आण्णाभाऊंना अभिवादन केले. शाहीर पवार यांनी या वेळी आण्णाभाऊ साठे यांच्या जिवनावर पोवाडा सादर केला.

कार्यक्रमाचे संचालन रविद्र वाघ यांनी तर आभार संदिपदादा गवई यांनी मानले.

# महापुरुषांचे कार्य सदैव प्रेरणादायी : अशोक शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड येथे लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती निमित्त प्रतिमेस विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



याप्रसंगी शेळके हे व्यासपीठावरून बोलतांना लोकमान्य टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते होते. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना भारतीय असंतोषाचे जनक म्हटले असून त्यांना लोकमान्य ही पदवी देखील बहाल करण्यात आली आहे.त्याचा अर्थ लोकांनी त्यांचा (नेता म्हणून) स्वीकार केला असा होतो.

**न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड येथे लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन**

टिळक हे स्वराज्याचे प्रबळ पुरस्कर्ते होते. तसेच ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक मजबूत जहालवादी नेते होते. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच! या त्यांच्या घोषणेसाठी ते ओळखले जातात असे सांगून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले असून महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात त्यांच्या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसत असून महापुरुषांचे कार्य सदैव प्रेरणादायी असल्याचे मनोगतातून व्यक्त केले.

यावेळीविद्यार्थिनीकु.मृण्मयी दिवे,नयना भोगे,रुकसाना शेख यांनीही मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्दवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे, राहुल दवते, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

# लोकशाही साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती श्रावस्ती बुद्ध विहार, पिंपळे गुरव येथे साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पिंपळे गुरव/प्रतिनिधी : आज दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी श्रावस्ती बुद्ध विहार, पिंपळे गुरव यांच्या वतीने लोकशाही साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक व क्रांतिकारी कार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी प्रमुख म्हणून श्रावस्ती बुद्ध विहाराचे संस्थापक अध्यक्ष कैलास बनसोडे यांनी अण्णाभाऊंचे कार्य म्हणजे वंचित, शोषित, बहुजन समाजासाठीचे बळ असल्याचे सांगितले. त्यांनी फकिरासारख्या कादंबऱ्यांमधून समाजाला नवा दृष्टिकोन दिला आणि लोकशाही विचारांची मांडणी केली, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास प्रविण डावरे, उत्तम रोकडे, चंद्रकांत जगताप, जयवर्धन कांबळे, आगंदा चव्हाण, सुमेध लोंढे, आशा चव्हाण, विद्या कांबळे, प्रतिभा मोरे, सुप्रिया कडाळे, सीमा लोंढे, जयश्री कांबळे, मनीषा खंडाळे, इंदूबाई कडाळे, नूतन सोनवणे उपस्थित होते

कार्यक्रमात विद्यार्थी, स्थानिक नागरिक व विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना अण्णाभाऊ साठे यांच्या प्रेरणादायी कार्यावर आधारित पुस्तके वितरित करण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रावस्ती बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले, तसेच सूत्रसंचालन सुरेखा बनसोडे यांनी केले.

## स्वेरीमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

# लोकशाहीर अण्णाभाऊंच्या साहित्यातून सकारात्मकता डोकावते : डॉ. खेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'मराठी साहित्य क्षेत्रात अण्णाभाऊंच्या लेखन प्रतिभेने ग्रामीण भागातील साहित्याचे दालन अधिक समृद्ध आणि देखणे केले कारण लोकशाहीर अण्णाभाऊंच्या साहित्यात आणि शाहिरीमधून सतत सकारात्मकता डोकावते. बालपणी प्रतिकूल परिस्थितीमुळे आयुष्यातील केवळ एकच दिवस शाळा शिकणाऱ्या अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून समाजाला प्रेरणादायी मार्गदर्शन केले आणि त्यांच्या साहित्यावर आज अनेकजण पीएच.डी.चे संशोधन करतात.' असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्रथम वर्षाचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी केले.




गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्रथम वर्षाचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर हे मार्गदर्शन करत होते. सुरवातीला पालक शंकर कदम व प्रा. विलास शेळके यांच्या हस्ते साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य, शाहिरी, पोवाडे, लावणी व ग्रामीण साहित्य यावर सविस्तर माहिती दिली. पालक शंकर कदम व प्रा. विलास शेळके यांनी देखील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याबाबत विचार व्यक्त केले. यावेळी पालक यशवंत माने, डिप्लोमाचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी.मनियार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार,प्रवेश प्रक्रियेतील डॉ.करण पाटील, परीक्षा विभागाचे डॉ. सतीश लेंडवे, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस.बी. भोसले, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. एस. पी. पवार, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. सुमंत आनंद, डॉ. बादलकुमार, प्रा. एस. ए.गरड, प्रा. बागल, प्रा. हल्लूर, प्रा. पारखे, इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग आदी उपस्थित होते.




# डुबेरे येथील जनता विद्यालयात लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते. व्यासपीठावर पर्यवेक्षक उल्हास पवार ज्येष्ठ शिक्षक पी.आर.करपे , सोमनाथ गिरी, सोमनाथ पगार,कचेश्वर शिंदे,रामदास वारुंगसे आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते टिळक व साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले होते .टिळक व साठे यांच्या जीवन व कार्याचा परिचय अनन्या कडभाने, अनुष्का माळी, प्रिया वाजे व आराध्या वाजे या विद्यार्थ्यांनी करून दिला.इयत्ता आठवी तु- ब चे वर्गशिक्षक सोमनाथ गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले.

यावेळी बोलतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष उगले म्हणाले की, टिळक यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अथक परिश्रम घेतले. आपल्या वृत्तपत्रातून इंग्रज सरकारविरुद्ध जनजागृती केली. म्हणून त्यांना असंतोषाचे जनक म्हणतात.तसेच अण्णाभाऊ साठे हे थोर समाजसुधारक होते. आपल्या साहित्यातून त्यांनी दलित, कष्टकरी व कामगारांचे प्रश्न मांडले.टिळक व साठे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. सूत्रसंचालन मानसी वारुंगसे व धनश्री माळी यांनी केले तर अनुश्री कुंदे आभार व्यक्त केले .यावेळी कार्यक्रमास विद्यालयातील सुनिल ससाणे, शिवाजी गुरुळे, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना

सोलापूर : कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील भूमिहिन शेतमजूर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना २ एकर बागायत किंवा ४ एकर जिराईत जमीन १०० टक्के अनुदान स्वरुपात खरेदी करुन देण्यात येत असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसुचित जातीचा दारिद्र्य रेषेखालील .व कुटुंब प्रमुखाचे वय ६० वर्षापेक्षा जास्त आहे. अशा कुटुंबातील ६० वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या कुटुंबा प्रमुखाच्या पत्नीला या योजनेचा लाभ घेता येईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी विक्रिसाठी जमीन उपलब्ध असलेल्या गावाचा रहिवाशी असावा. प्रस्तुत योजनेंतर्गत ज्या गावात जमीन उपलब्ध आहे त्याच गावातील पात्र लाभार्थ्यांची प्रथम निवड करण्यात येईल व त्या गावातील लाभार्थी उपलब्ध नसल्यास लगतच्या इतर गावातील पात्र लाभार्थ्यांना जमीनीच्या उपलब्धतेनुसार चिठ्या टाकून जिल्हा समितीच्या मान्यतेने विहित कार्यपध्दती नुसार पारदर्शक पध्दतीने लाभ देण्यात येईल.

दारिद्र्‌ रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द प्रवर्गातील परित्यक्ता स्त्रिया , दारिद्र्‌ रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द विधवा स्त्रिया , अनुसुचित जाती /जमाती कायद्यांतर्गत जातीचे आत्याचारग्रस्त या घटकांना लाभार्थी निवडीमध्ये प्राधान्य देण्यात येईल. महसुल विभागाने गायरान व सिलिंगच्या जमिनीचे वाटप केलेल्या कुटुंबांना लाभ अनुज्ञेय नाही. या योजनेंतर्गत जमीनीचे वाटप झाल्यानंतर संबंधित लाभ धारकाने स्वता: जमीन कसणे आवश्यक आहे. सदर जमीनीचे अन्य व्यक्तीस, संस्थेस हस्तांतरण व विक्री करता येणार नाही तसेच लीजवर भाडेपट्याने देता येणार नाही. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना लाभ देण्यासाठी जिल्हा समाज कल्याण कार्यालयास जमीन खरेदी करावयाची आहे. जमीन कसण्यास अयोग्य, डोंगर उताराची, खडकाळ व नदी पात्रा जवळच्या क्षारयुक्त व क्षारपड जमीन असू नये. जमीन सलग असावी, शेत जमीन विना बोजा व कुळ नसलेली असावी तसेच जमीन कोठेही गहाण अथवा वादग्रस्त नसावी.जमीन विक्रीच्या अर्जावर शेतजमीन विक्री करणाऱ्या जमीन मालकाशिवाय संबंधिताच्या कुटुंबातील दोन व्यक्तींची जमीन विक्रीस संमतीबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. जे जमीन मालक जिरायत जमीन कमाल ५ लाख रुपये प्रती एकर व बागायत जमीन कमाल ८ लाख रुपये प्रती एकर प्रमाणे विक्री करण्यास तयार आहेत अशा जमीन मालकांनी जमीनीच्या ७/१२ व आवश्यक कागदपत्रासह सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, कार्यालय, सोलापूर यांचेशी संपर्क साधावा.

तसेच सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसुचित जाती नवबौध्द घटकातील पात्र लाभार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज सहायक आयुक्त समाज कल्याण सोलापूर यांच्या कार्यालयाकडे दाखल असे आवाहनही समाज कल्याणचे सहायक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

### अशासकीय शिपाई पदासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात भरती

सोलापूर : सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात शिपाई अशासकीय एक पद मेस्को मार्फत भरावयाचे आहेत. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह दिनांक १२ ऑगस्ट २०२५ पुर्वी जिल्हा सैनिक कार्यालयात सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलींद तुंगार यांनी केले आहे. जिल्ह्यातील माजी सैनिक तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांच्या रोजगार पटावर नोंद असलेल्या माजी सैनिकांना प्राधान्य देण्यात येईल. प्राप्त अर्जामधील उमेदवारांची दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी दु.१.०० वाजता मुलाखत घेण्यात येईल.

# पंढरपूरात महसूल सप्ताहाचा शुभारंभ

## उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी पुरस्कार वितरण; लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : तहसिल कार्यालय पंढरपूर येथे आज महसूल सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. पंढरपूर तालुक्यातील महसूल कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांचा वर्षभरातील कामगिरी बाबत उत्कृष्ट पुरस्कार देण्यात आले. तसेच तालुक्यातील लाभार्थ्यांना विविध प्रमाण-पत्राचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.






यावेळी नायब तहसिलदार व्ही. व्ही. बुचके, उत्कृष्ट मंडळ अधिकारी आर.बी. वाघमारे, उत्कृष्ट सहायक महसूल अधिकारी डी. के. गावदरे, उत्कृष्ट ग्राम महसूल अधिकारी आर.बी. लोखंडे, उत्कृष्ट महसूल सहायक विजय झोरे, उत्कृष्ट शिपाई बी.एम. शिंदे, उत्कृष्ट महसूल सेवक, शिवा सलगर, उत्कृष्ट पो-लीस पाटील, बालाजी माने यांना उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसिलदार सचिन लंगुटे, यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांना तहसिल कार्यालय या ठिकाणी बोलावून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडण्याबाबतची कार्यवाही करणेचे निर्देश यावेळी देण्यात आले.

तसेच पंढरपूर तालूक्यातील तहसिलदार व नगर भूमापन अधिकारी अशा प्रकरणांवर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १५५ खालील प्रकरणांबाबत निर्णय घेऊन एकूण २२ आदेश पारित करून ७/१२ दुरूस्ती करून संबंधित खातेदार यांना वाटप करण्यात आले. त्याचबरोबर शासनाने तयार केलेले ई-हक्क पोर्टलवर सेतु सुविधा केंद्रामार्फत नोंदवून त्यानंतर तहसिलदारांकडे पाठविण्यात यावीत याबाबत मार्गदर्शन करण्यात आले व कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

तहसिलदार सचिन लंगुटे यांचा उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते सन्मान

राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम राबविल्याबद्दल पुणे विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला, यावेळी पंढरपूरचे तहसिलदार सचिन लंगुटे यांचा विभागीय स्तरावर उत्कृष्ट तहसिलदार म्हणून विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे उपमुख्यमंत्री अजित पवार, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते सन्मान करणेत आला.

तसेच सोलापूर जिल्यातील उत्कृष्ट खो खो खेळाडू म्हणून श्री. पंकज राठोड मंडळ अधिकारी कासेगाव तालुका पंढरपूर राष्ट्रीय व अनेक राज्य स्तरीय खो खो स्पर्धामध्ये विशेष प्राविण्य मिळवल्या बदल सन्मान यावेळी करण्यात आला.

# भिवंडी ते शिर्डी पायी पालखी सोहळ्याचे शिर्डीत आगमन!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी

समाज कल्याण न्यास या संस्थेमार्फत गेल्या बावीस वर्षांपासून अखंडपणे भिवंडी ते शिर्डी पायी पा-लखी सोहळा आयोजित करण्यात येतो. यावर्षीही भक्तीमय वातावरणात, मोठ्या उत्साहात आणि निष्ठेने पालखीने शिर्डीत प्रवेश केला.



शिर्डीतील साई पालखी निवारा येथे पालखीचे आगमन होतात पारंपारिक वाद्याच्या गजरात. फुलांच्या वर्षावात आणि साईराम इच्छा जयघोषात स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित साई भक्तांच्या डोळ्यात भक्ती भवानी पाणी तरळले.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि दैनिक गावकरी समूहाच्या वतीने डॉक्टर सोन्या पाटील यांचा आणि साईबाबांचा दिवाना म्हणून प्रसिद्ध अस-लेले जेके पाटील यांचे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या गौरव सोहळ्यात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गावकरी चे संपादक डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी आपली उपस्थिती दर्शवत पालखी सोहळ्याची सामाजिक व आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित केली. त्यांनी आपल्या भाषणात अशी सांगितली की या प्रकारचे उपक्रम समाजामध्ये श्रद्धा एकता आणि सेवाभावना वृद्धिगत करतात समाज कल्याण न्यासाचे कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे

शिर्डी मध्ये पालखीचे आगमन हा एक भक्ती, शिवा भाऊ आणि सामाजिक एकात्मतेचा उत्तम संगम ठरतो. या दिव्य सोहळ्याचे यशस्वी आयोजन आणि सहभाग यामुळे शिर्डीतील वातावरण भक्तीमय आणि सकारात्मक ऊर्जा प्रधान करणारे ठरले.

# उद्या माढा येथील माढेश्वरी अर्बन को-ऑपरेटिव डेव्हलपमेंट बँकेची तिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

माढा येथील माढेश्वरी अर्बन को-ऑपरेटिव डेव्हलपमेंट बँकेची ३० वि वार्षिक सभ रविवार दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी दहा वाजता बँकेचे चेअरमन माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली चेअरमन अशोक लोनावत यांच्या अध्यक्षतेखाली माडा येथे बँकेच्या मुख्य कार्यालयात संपन्न होणार आहे. या सभेला सर्व सभासद ठेकेदार कर्जदार हितचिंतक आणि वेळेवर उपस्थित राहावे असे आव्हान बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रेय मुळे यांनी केले आहे.

सध्या माढेश्वरी बँकेच्या माढा, पंढरपूर लोणी काळभोर, टेंभुर्णी, करकम, कुर्डूवाडी, सोलापूर, करमाळा, मोडनिंब येथे अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने सर्व सभासदांच्या विश्वासास पात्र असून नऊ शाखा सुरू आहेत सध्या बँकेचे १०७०४ सभासद आहेत. बँकेला सातत्याने ऑडिट वर्ग' अ'मिळाला आहे तू सर्वांच्या सहकार्याने सध्या बँकेत २१६ कोटी ७८ लाख ठेवी आहेत. मागील सलग चार वर्षापासून बँकेचा (शून्य) टक्के राखण्यात हेच मिळाले आहे बँकेने एकत्रितपणे ३३३ कोटीच्या वार्षिक उलाढाल केली आहे





बँकेच्या वतीने आर्थिक व्यवहाराबरोबरच विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना मोफत नेत्र चिकित्सा मोतीबिंदू शस्त्रक्रिया पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी निवासांची भोजनाची व चहापाण्याची व्यवस्था आधी सामाजिक उपक्रम दरवर्षी राबवले जा-तात बँकेकडून सभासद खातेदार ठेविला व कर्जदार राष्ट्रीयकृत बँकेप्रमाणे सर्व अद्यावत सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

बँकेच्या सर्व सभासद खातेदारांनी आधार कार्ड पॅन कार्ड फोटो मोबाईलवर नंबर देऊन केवायसी ची पूर्तता करून घ्यावी व सभासद व खातेदारांनी वारसाच्या नोंदी केल्या नाहीत त्यांनी नोंदी करून घ्यावी असे आव्हान बँकेचे व्यवस्थापक नंदकुमार यांनी वसुली अधिकारी राजकुमार भोळे यांनी केले आहे.

# आई हा कुटुंबाचा कणा आहे, आहारात प्रोटीनला महत्व द्या : डॉ. मीनल चिडगुपकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आई हा कुटुंबाचा कणा आहे. ती केवळ कुटुंब वाढवत नाही तर त्याचे आधारस्तंभही असते. त्यामुळे तिचे आरोग्य टिकवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, आईच्या आहारात प्रोटीनयुक्त अन्नपदार्थ असणे गरजेचे आहे. आहारातील मोठा भाग प्रोटिन्सनी भरलेला असावा. यासाठी डाळी, मोड आलेली कडधान्ये आणि हिरव्या पालेभाज्यांचा आहारात समावेश केला पाहिजे. सर्वांनी आरोग्यदायी आ-हार घ्यावा, बाळासाठी केवळ आणि केवळ आईचे दूधच योग्य असून, कृत्रिम अन्नपदार्थ किंवा तयार दूध देणे टाळावे. बाळाच्या पहिल्या सहा महिन्यांत केवळ स्तनपानच आवश्यक असून ते बाळाच्या आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे असे प्रतिपादन स्त्रीरोग व प्रसूती शास्त्र तज्ज्ञ डॉ. मीनल चिडगुपकर यांनी केले.



त्या रोटरी ई क्लब ऑफ सोला-पूर इलाईट, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, सोलापूर महानगरपालिका साबळे नागरी आरोग्य केंद्र,एकात्मिक बालविकास नागरिक प्रकल्प केंद्र क्र. १ व डॉ. चिडगुपकर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्तनपान जनजागृती सप्ताह निमित्त गरोदर महिला व स्तनदा मातांना प्रोटीन पावडर वाटप कार्यक्रमात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन रोटरी ई क्लबचे अध्यक्ष बालमुकुंद राठी यांच्या हस्ते रोपाला पाणी देऊन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन.बी. तेली, कार्यकारी सदस्या प्रा. डॉ. विजया महाजन, डॉ. राजीव प्रधान, कॅन्सर सर्जन डॉ. अवधूत डांगे, डॉ. सारिका नरळे,दीपमालिका राठी, पी.एच.एन. भूमिका माने, संदीप कुलकर्णी, अर्पिता डोईजोडे, मोनिका तोष्णीवाल, पायल तापडिया, सीमा भुताडा, राणी सोनाली आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले की, स्तनपान हे बाळासाठीच नव्हे, तर आईच्या आरोग्यासाठीही फायदेशीर ठरते. त्यामुळे स्तनपान ही एक नैसर्गिक, सुरक्षित आणि पौष्टिक प्रक्रिया असून तिचे महत्त्व प्रत्येक आईने आणि कुटुंबाने ओळखणे गरजेचे आहे. कार्यक्रमास सोमपा साबळे नागरी आरोग्य केंद्र च्या अशा वर्कर व एकात्मिक बालविकास नागरिक प्रकल्प केंद्र क्र. १च्या अंगणवाडी सेविकांनी ६० गरोदर व स्तनदा मातांना कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आणल्या होत्य. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. अवधूत डांगे यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार डॉ. विजया महाजन यांनी मानले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात

### अजीम नवाज राही यांचे प्रतिपादन

# संघर्षशील आयुष्याचे धगधगते निखारे अण्णाभाऊंनी अभिव्यक्तीत एकवटले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनाला जीवनाचा वेग होता, त्यांच्या कथा,कादंबऱ्यातला नायक जीवनाशी लढणारा होता,झगडणारा होता,त्यांच्या कथा आणि कादंबरीतले नायक कोपलकल्पित नव्हते, अडलेल्या नडलेल्या,मोडलेल्या माणसांच्या भेगाळलेल्या दैनंदिनीच ते प्रतिनिधीत्व करत होते,

मराठी साहित्याच्या क्रांतीकारी वळणांचा मागोवा घेतला जातो तेंव्हा समीक्षकांना अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याला वळसा घालून पुढे सरकताच येत नाही,सर्वसामान्य माणसाच्या संघर्षशील आयुष्यातले वास्तवाचे धगधगते निख-रे अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या मायाळू अभिव्यक्तीच्या पदरात एकवटले असे चिंतनीय प्रतिपादन प्रख्यात मराठी कवी,नामवंत निवेदक अजीम नवाज राही यांनी केले

साखरखेर्डा येथील मातंग वस्तीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती वीर लहुजी साळवे प्रतिष्ठानाचे वतीने उत्साहात साजरी झाली,यावेळी प्रमुख वक्ते अजीम नवाज राही आणि प्रमुख अतिथी महणून सरपंच सौ ज्योतीताई सचिन जाधव,माजी सरपंच रवींद्र पाटील,ओमसेठ अग्रवाल,माजी उपसभापती सुनिल जगताप, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य दिलीपराजे बेंडमाळी,मानवतकर टेलर, ग्रामपंचायत सदस्य संदीप खिल्लारे,शिवसेना नेते संदीप मगर इतर मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते,

प्रारंभी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि महापुरुषांच्या प्रतिमेला माल्यार्पणानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार वीर लहुजी साळवे प्रतिष्ठानाचे पदाधिकारी शाम पारधे, अविनाश पारधे, बंटी पारधे, विकास पारधे, उमेश पारधे, ओम पारधे,कृष्णा पारधे यांनी केला,

आपल्या मनोगतात अजीम नवाज राही पुढे म्हणाले की,आज वाचनाचा पाया भक्कम करण्यासाठी वाटसब,फेसबुक, इस्टा सगळी डिजीटल आयुधे माणसाच्या उशा-शी लोळण घेत आहे. दिड दिवसा-ची शाळा शिकलेले अण्णाभाऊ यांनी अक्षरज्ञान मुंबई शहरातल्या दुकानांच्या पाट्या वाचत मिळवलं, १३ सकस कथासंग्रह आणि ३५ वस्तुनिष्ठ कादंबऱ्यांची उतरंड रचली,जे जगले तेच अण्णाभाऊंनी साहित्यात मांडलं,जगणे आणि लिहिणे यात तसूभरही पडदा ठेवला नाही म्हणून काळ जसाजसा पुढे सरकत आहे अण्णाभाऊंच्या साहित्यली वास्तवाची दाहकता अधोरेखित करत आहे, प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन चित्रपट कलावंत गजानन भिमराव इंगळे यांनी केले

